# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धी पत्रक

- **मिरा भाईदर शहरात डिसेंबर २०२५ पर्यंत मेट्रो धावणार**
- **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कामकाजाचा आढावा**

मिरा-भाईंदर, ६ फेब्रुवारी २०२५: मिरा भाईंदर शहरातील मेट्रो मार्ग-९ चे काम जलदगतीने सुरू असून ८७ टक्के काम पूर्ण झाले आहे. या कामाची दोन टप्प्यात विभागणी करण्यात आली असून डिसेंबर २०२५ मध्ये मेट्रो रेल्वे सेवा सुरू होणार आहे. मिरा भाईंदर मेट्रोच्या कामाचा आढावा घेण्यासाठी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरूवारी महापालिका मुख्यालयात विशेष बैठकीचे आयोजन केले होती. या बैठकीत शहराच्या विकासाला गती देण्यासाठी प्रलंबित प्रकल्पांना वेग देण्याबाबत आणि भविष्यातील योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी, पोलीस आयुक्त मधुकर पांडे आणि मिरा भाईंदर महापालिका आयुक्त संजय काटकर उपस्थितीत होते. यावेळी दहिसर टोल नाक्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी १० पैकी ३ मार्गिका या अवजड वाहनांसाठी ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीत शहराच्या विकासाला गती देण्यासाठी प्रलंबित प्रकल्पांना वेग देण्याबाबत आणि भविष्यातील योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. रस्ते, वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर पायाभूत सुविधांसाठी ठोस उपाययोजना आखण्यात आल्याची माहिती आयुक्त संजय काटकर यांनी दिली. मिरा भाईंदर शहरात 'दहिसर भाईंदर मेट्रो मार्गीका ९ तयार करण्यात येत आहे. कंत्राटदाराला देखील २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.  या या प्रकल्पाचे स्थापत्य काम ८७ टक्के पूर्ण झाले असून मेट्रो स्थानक व मार्गीकेचे काम पूर्ण केले जात आहे. या मेट्रो मार्गीका ९ चे दोन टप्प्यात विभाजन करण्यात आले आहे. दहिसर ते सुभाषचंद्र बोस पर्यंत टप्पा-१ आणि पुढील टप्प्यात उत्तन पर्यंत मेट्रोचा विस्तार केला जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात मेट्रो मार्ग आणि कारशेडचे काम केले जाणार आहे. मेट्रो मार्गीकेच्या मूळ मार्गावर स्थानिक नागरिकांची घरे बाधित होत असल्याने स्थानिकांचा विरोध असल्याने त्यावर पुढील महिन्यात एमएमआरडीएच्या कार्यालयात बैठक घेऊन यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मिरा भाईंदर शहराच्या मुख्यमार्गावर मेट्रो रेल्वे खाली तीन उड्डाणपुल तयार करण्यात येत आहे. यातील अन्य दोन पुलाचे काम केले जात असून दुसऱ्या पुलाचे लोकार्पण येत्या १९ फेब्रुवारीला केले जाणार आहे.

दहिसर टोल नाक्यावर होणारी वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी गुरुवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्य महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी चिटणीस, पोलिस आयुक्त मधुकर पांडे आणि आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर (भा.प्र.से) यांनी टोल नाक्याची पाहणी केली. अवजड वाहनाच्या अनियंत्रित वाहतुकीमुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे लक्षात आले. त्यामुळे येथील १० पैकी तीन मार्गीका या केवळ अवजड वाहनांसाठी आरक्षित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**चौकट**

मिरा भाईंदर शहराचा शाश्वत विकास करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत विविध विकास कामे सुरू आहेत. यात घोडबंदर किल्ला ते शिवसृष्टी रस्त्याचे काम पूर्ण करण्याच्या कामास गती देण्यात येत आहे. तसेच रस्त्यातील बाधितांचे पुनर्वसन लगतच्याच परिसरात करण्याचे आश्वासन मा, सरनाईक यांनी केले आहे. यासह महिलांसाठी प्रसाधनगृहे, सॅनिटरी नॅपकीनची सुविधा, स्तनपानाकरिता हिरकणी कक्ष आदींची सुविधा उभारणी सुरू करण्यात येत आहे. तसच शहरात ट्रॅफिक पार्कची निर्मिती करण्यात येणार आहे. या पार्कमुळे लहान मुलांमध्ये वाहतुकीबाबत जनजागृती होईल.